**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल**

**अपिल क्रमांक : के.आर-६३६/२०२१**

**अपिलार्थी, श्री. नरेश कमलाकर सोमवंशी**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी,**
ग्रामपंचायत कार्यालय कांबा, पो.वरप,
ता.कल्याण, जि.ठाणे

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी,**
पंचायत समिती कल्याण यांचे कार्यालय
ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ ३०१

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ३.६.२०२२**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १६.९.२०२० | ----- | २३.११.२०२० | ---- |

अपीलार्थी यांनी आयोगाकडे दि.२८.१.२०२१ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ३.६.२०२२ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थितं आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त बाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तथापि, विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी आणि तत्कालीन व विद्यमान प्रथम अपिलिय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलिय प्राधिकारी हे कोणतीही सुचना न देता अनुपस्थित आहेत. त्यांची ही कृती योग्य नाही. सबब, प्रस्तुत प्रकरणी पुनश्चः सुनावणी घेण्यात येईल व त्या दिवशी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलिय प्राधिकारी यांची उपस्थिती अनिवार्य राहिल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१३ जुलै, २०२२ रोजी सकाळी ११:१५ वाजता घेण्यात येईल व त्या दिवशी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलिय प्राधिकारी यांची उपस्थिती अनिवार्य आहे.**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ३ जून, २०२२




(सुनील पोरवाल)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ